# प्रेसनोट

ला.प्र.वि., जळगाव.
दि.११/०२/२०२६.

१) लोकसेवक श्री. सदानंद व्यंकटी मुंडे, वय ३४ वर्षे, व्यवसाय नोकरी,तलाठी सजा ममुराबाद ता.जि.जळगांव वर्ग–०३

२) लोकसेवक श्री.अभिजित नामदेव येवले वय ३९ वर्षे, व्यवसाय नोकरी,मंडळ अधिकारी,सजा मसावद ता.जि.जळगांव वर्ग–०३, यांनी ३०,०००/– लाचेची मागणी करून, लोकसेवक क्र.१ सदानंद मुंडे यांनी स्विकारल्याने त्यांचेविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायदयान्वये कारवाई केलेबाबत.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :– | नाशिक/जळगाव. |
| पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक | :– | शनिपेठ पोलीस ठाणे गु.र.नं. /२०२६ |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७ व १२ प्रमाणे. |
| आरोपीचे नाव, वय व कार्यालय | :– | १) लोकसेवक क्र.१ सदानंद व्यंकटी मुंडे, वय ३४ वर्षे, व्यवसाय नोकरी,तलाठी सजा ममुराबाद ता.जि.जळगांव वर्ग–०३<br>२) लोकसेवक क्र.२ अभिजित नामदेव येवले वय ३९ वर्षे, व्यवसाय नोकरी,मंडळ, अधिकारी,सजा मसावद ता.जि.जळगांव वर्ग–०३ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | :– | ५०,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | ३०,०००/– रू. आलोसे क्र.१ यांनी स्वीकारली. |
| थोडक्यात हकिकत | :– | प्रस्तुत बातमीतील हकिकत अशी की, यातील तक्रारदार यांचे वाळू वाहतुक करण्याचा व्यवसाय असुन यातील आलोसे क्र.१ यांनी दि.०४.०२.२०२६ रोजी रात्रपाळी कर्तव्यावर असतांना रात्री १०.३० वा.गस्ती दरम्यान वाळूचे भरलेला डंपर पकडलेले होते.सदरचे डंपर आलोसे क्र.२ यांनी फोन केल्यानंतर त्यांचे सांगण्यावरुन सोडुन देण्यात आले होते. सदरचे वाळूचे डंपर सोडले व कारवाई केली नाही म्हणुन आलोसे क्र.१ व २ यांनी ५०,०००/– रुपये लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. ११/०२/२०२६ रोजी लाप्रवि.,जळगाव येथे लेखी तक्रार दिली. त्याप्रमाणे प्राप्त तक्रारीची पडताळणी केली असता, आलोसे क्र.१ व २ यांनी वाळूचे भरलेले डंपर सोडल्याचा मोबदल्यात व कारवाई न करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे ५०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३०,०००/– रुपये लाच रक्कमेची मागणी करुन सदरची लाच रक्कम आलोसे क्र.१ सदानंद मुंडे यांनी स्वीकारली, म्हणुन आलोसे क्र.१ सदानंद व्यंकटी मुंडे,तलाठी सजा ममुराबाद, आलोसे क्र.२ अभिजित नामदेव येवले,मंडळ अधिकारी सजा मसावद यांचेविरूध्द गुन्हा. सदरची कारवाई आलोसे क्र.२अभिजित येवले,मंडळ अधिकारी यांचे जुने जळगांव येथील घराचे खाजगी कार्यालयात करण्यात आली. |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| आरोपीची अंगझडती | | आरोपीची यांची अंगझडतीत व बॅगेतुन खालील प्रमाणे मुद्देमाल मिळुन आला<br>आलोसे क्र.१ यांच्याकडे रोख ४०,२००/- रुपये व एक Vivo कंपनीचा मोबाईल फोन<br>आलोसे क्र.२ यांच्याकडे रोख ७६००/- रुपये व एक Vivo कंपनीचा मोबाईल फोन |
| सापळा कारवाई | :- | १) पर्यवेक्षण व सापळा अधिकारी :- श्री.योगेश ठाकूर, पोलिस उप अधिक्षक, मो.९७०२४३३१३१<br>२) तपास अधिकारी :- श्रीमती स्मिता नवघरे, पोलिस निरीक्षक,<br>३) सापळा पथक :- श्रीमती रेश्मा अवतारे, GPSI सुरेश पाटील, चालक,पोना/बाळु मराठे, पोकॉ/राकेश दुसाने,पोकॉ/प्रदिप पोळ, पोकॉ/चंद्रशेखर चौधरी, |
| मागदर्शन | :- | १) मा. श्री. भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>२) मा. श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३) मा. श्री.सुनील दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि, नाशिक परीक्षेत्र, नाशिक. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कवभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगाव.

संकेतस्थळ :-**acbmaharashtra.gov.in**

ई-मेल:-**spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacbjalgaon@gmail.com**

ऑनलाईन तक्रार :-**acbmaharashtra.net**

टोल फ्रि क्रमांक :-**1064**

दुरध्वनी क्रमांक :-**0257-2235477**

पोलीस उप अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगाव

योगेश जी. ठाकूर
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

Scanned with OKEN Scanner